# सन्मान एका स्त्रीवादी पुरुषाचा!



हरीश सदानी

**लिंगभेदावर आधारित प्रश्नांबाबत जागरूकता करणाऱ्या आणि ते रोखण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या 'युवा मैत्री' या अभिनव उपक्रमाला नुकताच 'अशोका चेंजमेकर्स' या आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थेतर्फे नुकतेच विशेष पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. स्त्रियांवर होणाऱ्या लैंगिक हिंसाचाराविरोधात काम करणाऱ्या 'मावा' म्हणजेच 'मेन अगेन्स्ट व्हायोलन्स ॲण्ड ॲब्युज'चा हा उपक्रम. त्याचा पाया घालणाऱ्या 'मावा'च्या हरीश सदानी यांच्याविषयी**

**मेधा कुळकर्णी**

आकाशवाणीतल्या कामाचा भाग म्हणून काही निराळं काम करणारी माणसं शोधायची आणि त्यांच्या कामांना लोकांपर्यंत पोचवायचं असं मी करत असे. त्या क्रमात हरीश भेटला. हरीश सदानी. 'मावा' नावाच्या संस्थेचा सूत्रधार. संस्थेच्या नावातच कामाचं, कामामागच्या विचारांचं वेगळेपण आहे. 'मावा' म्हणजे 'मेन अगेन्स्ट व्हॉयोलन्स ॲण्ड ॲब्युज'- शारीरिक आणि मानसिक हिंसेच्या विरोधात असलेले पुरुष, त्यांची संस्था. शारीरिक ताकदीच्या आणि परंपरेने मिळालेल्या श्रेष्ठत्वाच्या जोरावर स्त्रियांचं दमन करणारे अशी पुरुषांची चौकटबद्ध प्रतिमा. या प्रतिमेला पूर्णपणे छेद देत चक्क हिंसेच्याच विरोधात आघाडी उभारणारे हे मावाचे पुरुष. आणि अशा कामाचा सूत्रधार हरीश.

खरं तर पुरुषांच्या परंपरागत भूमिकेशी विद्रोह करीत स्त्री-पुरुष समानतेची चळवळ सुरू करण्याचं आणि रुजवण्याचं काम करणारे अनेक पुरुष आपल्याकडे महाराष्ट्रात, बंगालात झाले. महात्मा फुले हे त्यातलं पहिलं नाव. समानतेच्या मूल्यावर आधारलेली अख्खी संस्कृतीच जोतिरावांनी आपल्याला देऊ केली. १९७५ नंतर पाश्चिमात्य स्त्री-वादाच्या प्रभावाने आपल्याकडे स्त्रियांच्या चळवळींनी जोर धरला आणि या स्त्री-चळवळींमध्ये समानतेचं मूल्य मानणाऱ्या काही सुजाण पुरुषांचा सक्रिय सहभाग राहिला. तरीही स्त्रियांचे प्रश्न मांडले जात होते. मुख्यतः स्त्रियांकडूनच. त्यामुळे प्रश्नांची आणि उत्तरांचीही मांडणी अर्थात स्त्रीसापेक्ष अशी होत राहिली. स्त्री-वादाचा असा एक चप्पा हळूहळू तयार होत गेला. स्त्री-चळवळीसाठी हे घातक होतं. सर्वसामान्य पुरुषवर्ग स्त्री-चळवळीपासून अंतर राखून होता. हरीशला काम करण्यासाठी इथेच स्वतःची जागा सापडली. हा काळ १९९० नंतरचा.

हरीश सांगतो- स्त्री-संघटना या एखादं बेट असल्यासारखं मला वाटायचं. या संघटना स्त्रियांचा दृष्टिकोन बदलण्यासाठी प्रयत्न करीत होत्या. पुरुषांवर जाणीवपूर्वक काहीच काम केलं जात नसे. स्त्री-अत्याचाराच्या काही प्रकरणांमध्ये वा एकूणच स्त्री-समस्यांवरच उपाय म्हणून संघर्षाचाच आधार घेतला जायचा. निषेध, धरणं, काळं फासणं, बहिष्कृत करणं, अद्दल घडविण्याची भाषा करणं वगैरे. अत्याचारित, अगतिक स्त्रीला अशी भूमिका घ्यावीशी वाटणं आपण समजू शकतो. पण पुरुष शोषक आणि स्त्रिया गरीब-बिच्चाऱ्या अशी सरसकट मांडणी करणं, तेही पुरुषांबरोबर काम न करता, हे बरोबर नव्हतं. अशा भूमिकेमुळे स्त्री-चळवळीविषयी आस्था असणारे वा समानतेचं मूल्य मानणारे पुरुष दुरावत चालले होते. अशा पुरुषांशी संवाद करून त्यांना 'मावा'ने कार्यप्रवृत्त केले. त्यांचा आवाज स्त्री-चळवळींपर्यंत पोचवला. कारण सर्व समाजाची साथ मिळाल्याशिवाय स्त्री-पुरुष समानतेची चळवळ पुढे कशी जाणार होती?

हरीशच्या कामाची एका वाक्यात नोंद करायची तर त्याने स्त्रियांच्या चळवळीला व्यापक विचार करायला भाग पाडलं, स्त्री-संघटनांनी पुरुषांची मानसिकता बदलण्यासाठी काम करण्याची, पुरुषांबरोबर संवाद करण्याची गरज आहे हे ठसवलं. हरीशसाठी हे सोपं नव्हतंच. स्वतःच्या घरातच त्याने जेव्हा जेव्हा स्त्रियांची बाजू घेण्याचा, त्यांना मदत करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा तेव्हा 'बायल्या'सारख्या विशेषणांनी त्याची संभावना झाली होती. पुढे व्यावसायिक कार्यकर्ता झाल्यावर त्याने आपले मुद्दे पुढे रेटण्याचा प्रयत्न केला. तेव्हा पुरुषांबरोबर वेगळं काम करण्याची गरज काय, असा प्रश्न त्याला स्त्री-संघटनांकडून वारंवार विचारला गेला.

स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात आवाज उठवावा, असं ज्या पुरुषांना वाटतं त्यांनी पुढे यावं, या वर्तमानपत्रातल्या आवाहनाने हरीशला पुढची वाट सापडली. प्रतिसाद देणाऱ्या २०५ पुरुषांपैकी हरीशसह ९० मुंबईतले होते. यातल्याच एका गटाने 'मावा'ला आकार दिला. चळवळीची पार्श्वभूमी असलेल्या रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ आणि राजीव कालेलकर यांनी 'मावा'ची वैचारिक बैठक पक्की करायला मदत केली. समानतेसाठीच्या चळवळीत नवे पुरुष, विशेषतः तरुण मुलगे जोडले जावेत यासाठी. पुरुषांची फौज वाढविण्यासाठी, पुरुषांना निराळा अवकाश (स्पेस) मिळावा यासाठी प्रयत्न करणं. समानतेच्या चळवळीची 'मालकी' ही पुरुषांनी घ्यावी आणि एक सुजाण माणूस होण्याच्या दिशेने मार्गक्रमण सुरू करावं, यासाठी मावाने अनेक उपक्रम केले आहेत. युवा मैत्री हा अलीकडचा वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम. महाराष्ट्रातल्या शंभर तरुण मुलांना माणुसकीची वाट दाखविणारा. पुरुषांची मानसिकता बदलण्याचं काम अधिक अवघड असल्याचं हरीश सांगतो. समानतेच्या मूल्याबद्दल चाड असली, तरी घरात, बाहेर पुरुषपणाचे मिळणारे फायदे सोडायची त्यांची; मुलांचीही तयारी नसते.

युवा मैत्रीतल्या शंभरातला एक गणेश फुले. फुल्यांच्याच खानवली गावचा. तालुका पुरंदर, जिल्हा पुणे. तो सांगतो- 'दोन्ही बाजूंनी आम्हाला प्रश्न पडतात. पुरुषांसाठीच्या नियमांचाही आम्हा मुलांना त्रास होतो. आम्हीच केस बारीक का ठेवायचे? वाढवायचे का नाहीत? आणि घरात माझ्या बहिणीसाठी संध्याकाळच्या आत घरी परतण्याचा दंडक का? मुलींनी शर्ट-पँट घालणं आणि मुलग्यांनी कानातलं घालणं हे वरवरचं झालं. स्त्रिया आणि पुरुष दोघांनीही घरात-बाहेर जोडीने विश्वास आणि आदर ठेवून काम करणं व्हायला पाहिजे. आज मुली मोठ्या संख्येने सर्व क्षेत्रात चमकताहेत, मेरिटमध्ये येताहेत. ही चांगलीच गोष्ट आहे. पण त्याचबरोबर मुलांना अस्वस्थ, असुरक्षित वाटतंय. याचा अर्थ स्त्रियांनी मागे राहावं असं आम्हाला वाटतंय का? तर तसंही नाही. पण स्त्रियांच्या पुढे येण्याने आमच्यात न्यूनगंडही तयार व्हायला नको. स्त्री आणि पुरुष एकमेकांचे स्पर्धक नसून जोडीदार आहेत याचं नीट भान दोघांनाही येणं गरजेचं आहे.

'मावा' हे काम करू शकते, असा विश्वास गणेशसारख्या तरुणांना वाटणं हेच हरीश सदानीच्या कामाचं यश समजलं पाहिजे. अर्धं आकाश स्त्रियांचं असलं तरी आज जगाचे नागरिक होऊ पाहणाऱ्या स्त्री-पुरुष दोघांनाही जोडीने भराऱ्या घेण्यासाठी पूर्ण आकाश मोकळं आहे. त्यांना या भराऱ्या घेण्यासाठी भान आणि बळ देण्याचा हरीशचा प्रयत्न आहे. (युवा मैत्री हेल्पलाईन- ०२२-२६८२६०६२)